MHKO180008242025

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र. ४२९/२०२५**
**महाराष्ट्र सरकार वि. शामराव लक्ष्मण नाईक**

**:: न्या य नि र्ण य ::**

**निशाणी क्र.०६ लगत**

(अधिघोषित दिनांक २०.०३.२०२६)

अभियोगपक्षातर्फे विद्यमान सहाय्यक सरकारी वकील श्री. सं.सि.नदाफ व आरोपीतर्फे विद्यमान वकील सौ. श.प्र.पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

०२. अभिलेखावरील पुराव्यावरुन व दोन्ही पक्षांच्या युक्तिवादावरुन न्यायनिर्णयासाठी उपस्थीत झालेले मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसासहित खालीलप्रमाणे :–

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपी घटनेवेळी विनापरवाना बेकायदेशीररित्या देशी दारुच्या बाटल्या बाळगून असतेवेळी राज्य उत्पादन शुल्क कर्मचारी यांना मिळून आला, ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | ... नाही. |
| २. | आदेश काय ? | ... आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

०३. आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने पंच रविंद्र राजहंस सोनवणे यांची एकमेव साक्ष निशाणी क्र.०६ लगत नोंदविली आहे. त्यानंतर, तक्रारदार जवान मारुती नारायण पोवार, तपासीक अंमलदार दुय्यम निरीक्षक श्री. वाय.एन.फटांगरे, राज्य उत्पादन शुल्क, विभागीय भरारी पथक, कोल्हापूर व उर्वरीत साक्षीदार यांची साक्ष नोंदविण्याकरीता अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने उक्त साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही. त्यामुळे, अभियोगपक्षाचा पुरावा निशाणी क्र.०१ वरील आदेशान्वये बंद करण्यात आला. आरोपीस गुन्ह्यात गोवण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभियोगपक्षाने अभिलेखावर आणला नसल्यामुळे आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

## :: कारणमिमांसा ::

**मुद्दा क्र.१ करीता** :-

०४. पंच रविंद्र यांनी दिनांक १९.०८.२०२५ रोजी राज्य उत्पादन शुल्क कर्मचा-यांनी एका कागदावर त्यांची सही घेतल्याचे कथन केले आहे. घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यावरील सही त्यांची असली तरी, त्यातील मजकुराविषयी त्यांना काहीही माहिती नसल्याचे त्यांनी कथन केले आहे.

०५. पंच रविंद्र हे अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य करीत नसल्यामुळे विद्यमान सहाय्यक सरकारी वकील यांनी न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले. मात्र, त्यामधुन अभियोगपक्षास उपयुक्त अशी कोणतीही बाब अभिलेखावर आणता आली नाही. त्यामुळे, पंच रविंद्र यांच्या साक्षीपुराव्यातुन अभियोगपक्षास प्रस्तुत प्रकरणातील घटना तसेच घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा सिध्द करता आला नाही.

०६. अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवून देखील अभियोगपक्षाने तक्रारदार, तपासीक अंमलदार फटांगरे व दुसरे पंच मंगेश यांची साक्ष अभिलेखावर नोंदविली नाही. तक्रारदार यांच्या साक्षीपुराव्याअभावी अभियोगपक्षास छापील प्रथम खबरी अहवाल सिध्द करता आला नाही. तसेच, तपासीक अंमलदार फटांगरे व पंच मंगेश यांच्या साक्षीपुराव्याअभावी आणि पंच रविंद्र यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे अभियोगपक्षास जप्ती पंचनामा सिध्द करता आला नाही.

०७. अभियोगपक्षाने प्रादेशिक न्यायसहाय्यक वैद्यकिय प्रयोगशाळा, कोल्हापूर येथून रासायनिक पृथ्थ:करण अहवाल प्राप्त करुन अभिलेखावर दाखल केला नाही. सबब, तपासीक अंमलदार फटांगरे यांनी घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्याद्वारे जप्त केलेला तथाकथीत मुद्देमाल निश्चितपणे देशी दारु होती किंवा काय, याबाबत साशंकता निर्माण झाली आहे. त्यामुळे, अभियोगपक्षाने जरी उपरोक्त नमूद साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदविली असती तरी जोपर्यंत

घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्याद्वारे जप्त केलेला तथाकथीत मुद्देमाल निश्चितपणे देशी दारुच होती, ही बाब रासायनिक पृथ्थ:करण अहवालातुन अभियोगपक्ष संशयापलीकडे सिध्द करत नाही, तोपर्यंत आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द होवू शकत नाही.

०८. वरील विवेचनावरुन असे दिसुन येते की, पंच रविंद्र यांनी अभियोगपक्षास पुराव्याकामी सहकार्य केले नसल्यामुळे तसेच, तक्रारदार, तपासीक अंमलदार फटांगरे व पंच मंगेश यांच्या साक्षीपुराव्याअभावी आणि रासायनिक पृथ्थ:करण अहवालाअभावी अभियोगपक्षास आरोपीविरुध्द कोणताही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सुसंगत असा सबळ पुरावा अभिलेखावर आणला नाही. त्यामुळे, अभियोगपक्षास आरोपीविरुध्द लावण्यात आलेल्या गुन्ह्याची मुलतत्वे संशयापलीकडे सिध्द करता आली नाहीत. सबब, अभियोगपक्षास आरोपीविरुध्दचा गुन्हा संशयापलीकडे सिध्द करता आला नाही. म्हणुन, मुद्दा क्र.१ करीता मी नकारार्थी उत्तर देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता</u>** :–

०९. अभियोगपक्षाच्या एकुण साक्षीपुराव्यावरुन आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्यामुळे, आरोपीस संशयाचा फायदा देवून त्याची प्रस्तुत गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित होईल. म्हणुन, मुद्दा क्र.२ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**:: <u>आ दे श</u> ::**

१. आरोपी शामराव लक्ष्मण नाईक याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५ (ई) या गुन्ह्यातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३७८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन कद्बे अपिलीय कालावधीनंतर रद्द करण्यात येत आहेत.

३. जप्त मुद्देमालातील एक कापडी पिशवी ही मुल्यहीन व निरुपयोगी असल्यामुळे सदर मुद्येमाल अपीलीय कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी.

४. तपासीक अंमलदार यांनी जप्त मुद्देमालातील देशी दारुच्या बाटल्यांचा अपिलीय कालावधीनंतर नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्याकरीता सदर मुद्देमाल मा. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर यांच्याकडे महाराष्ट्र दारु प्रतिबंधक अधिनियमाचे कलम १०० व १०१ अन्वये पाठवावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषीत करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by BALASAHEB SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2026.03.23 17:35:52 +0530

दिनांक : २०.०३.२०२६.
कुरुंदवाड.

(बाळासाहेब श्री. गायकवाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, कुरुंदवाड.